# रत्नागिरी शहरानजीक साकारतेय 'वनस्पती उद्यान'

## आयुर्वेदिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण वनस्पतींची लागवड;गतवर्षीच्या लागवडीतील १०५ रोपांचे संगोपन, यंदाच्या पावसाळ्यात ४० नव्या वनस्पतींची लागवड

प्रतिनिधी
रत्नागिरी

रत्नागिरीतील 'आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन' ही संस्था २०१० पासून मुलांचा सर्वांगिण विकास, भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रसार आणि पर्यावरण रक्षणासाठी निसर्गाचे संगोपन या तीन क्षेत्रांत भरीव कार्य करत आहे. पर्यावरण रक्षणाच्यादृष्टीने संस्थेने रत्नागिरीतील औद्योगिक वसाहतीमध्ये ६ एकर जागेत भव्य 'वनस्पती उद्यान' साकारले आहे. यामध्ये गतवर्षी आयुर्वेदिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या १२५ वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. तर या पावसाळ्यात यामध्ये आणखी ४० नव्या वनस्पतींची नव्याने लागवड करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक नंदकुमार पटवर्धन यांनी 'तरुण भारत' दिली.

'आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन'चे रत्नागिरी शहरानजीकचे हे पहिले 'वनस्पती उद्यान' ठरणार आहे. गतवर्षीपासून या उद्यानाला आकार देण्यास सुरुवात झाली आहे, सध्या हे उद्यान प्राथमिकस्तरावर आहे. गतवर्षी या उद्यानात एकूण १२५ वनस्पतींची लागवड करण्यात आली. या वनस्पतींचे उत्तमरित्या संगोपन करण्यात येत आहे. यातील १०५ वनस्पती जगल्या आहेत. तर यावर्षी यामध्ये नव्या ४० वनस्पतींची भर पडणार आहे. भविष्यात निश्चित हे उद्यान रत्नागिरीकरांचे आकर्षण ठरेल, यात शंका नाही.

उद्यानात वृक्षांची निवड करताना औषधी गुणधर्मासोबतच त्या वनस्पतीचे पर्यावरणदृष्ट्या महत्त्व जाणून घेऊन वृक्षांची निवड करण्यात आली आहे. या वृक्षांमध्ये पक्षांचा अधिवास वाढेल, तसेच फुलपाखरे, चतुर आदी किटकही आकर्षित होण्यादृष्टीने यामध्ये वनस्पतींची निवड करण्यात आली आहे. यामध्ये ऐन, सीता अशोक, उंबर, पिंपळ, सुरंगी, भारंगी, वड, पळस, रुद्राक्ष, अर्जुन, काटेसावर, साग, शिसम, खैर, बकुळ, नीम, अश्वगंधा, बेल, आवळा, बर्ड चेरी आदी विविध वृक्षांचा समावेश आहे.

भविष्यात धोक्यात आलेल्या देशी वनस्पतींच्या प्रजाती वाढवण्यासाठी सीडबँकची निर्मिती करण्याचाही संस्थेचा मानस आहे. संस्थेच्या पाठीमागे सुप्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ, पक्षीतज्ज्ञ किरण पुरंदरे, तसेच डॉ. प्रशांत पटवर्धन, शिल्पा पटवर्धन यांसारख्या व्यक्ती पाठीमागे भक्कमपणे उभ्या आहेत.

### उपक्रमासाठी शाळांना आवाहन

'आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन' विद्यार्थी व लोकसहभागाने या उपक्रमांना चळवळ स्वरूप देण्यासाठी प्रयत्नशील आहे. शाळेकडे जागा असल्यास आणि त्याठिकाणी झाडे लावून मुलांना ती झाडे लावून जगवण्यासाठी दत्तक देण्यास संस्था मोलाचे सहकार्य करणार आहे. ५ मुलामागे एक झाड देऊन दहावीपर्यंत ते झाड जगवण्याची जबाबदारी देण्याची संस्थेची संकल्पना आहे. तरी ज्या संस्थेची, शाळांची जागा आहे, अशा इच्छुक शाळांनी, संस्थांनी या पावसाळ्यात संस्थेकडे संपर्क साधण्याचे आवाहन संस्थापक नंदकुमार पटवर्धन यांनी केले आहे. यासाठी आसमंत बेनोव्हलन्स फाऊंडेशन, पीएम ७५, एमआयडीसी मिरजोळे, ९९७००५६५२३ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



रत्नागिरी : वनस्पती उद्यानमध्ये बहरणारे पिंपळ रोप.